# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्रमांक. :
०२०–२५६०१२२३
०२०–२५६०१३५३
०२०–२५६०१२६३

गणेशखिंड, पुणे ४११००७
अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्ष
naac@unipune.ac.in
iqac@unipune.ac.in

संदर्भ क्र.:– अंगुसिक/अभाउशिसका/ 932 दिनांक – ३१/१२/२०१९

प्रति,
मा. प्राचार्य/मा. संचालक,
सर्व संलंग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,
पुणे ४११००७.

विषय – **अखिल भारतीय उच्चतर शिक्षा सर्वेक्षण कार्यक्रम (A.I.S.H.E.) मध्ये शैक्षणिक वर्ष सन २०१९–२० ची माहिती भरणेबाबत.**

संदर्भ – १. मा. शिक्षण संचालक, (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. उशिसं/सांख्यिकी/एआयएसएचई/२०१९–२०/१६५८९, दि. ३० डिसेंबर, २०१९ रोजीचे पत्र.
२. मा. संचालक, मानव संसाधन विकास मंत्रालय, नवी दिल्ली यांच्याकडून दि. २६/१२/२०१९ रोजीचा प्राप्त मेल.

महोदय/महोदया,

प्रतिवर्षाप्रमाणे मानव संसाधन विकास मंत्रालय, नवी दिल्ली यांच्याकडून भारतातील तसेच महाराष्ट्र राज्यातील उच्च शिक्षणाबाबतचे धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी **सन २०१९–२०** या शैक्षणिक वर्षाची सांख्यिकी माहितीची अत्यंत आवश्यकता आहे. त्या अनुषंगाने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न असलेल्या पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हयामधील व दादरा नगर हवेली या केंद्रशासित प्रदेशातील अनुदानित, विनाअनुदानित व कायम विनाअनुदानीत महाविद्यालय व परिसंस्थांकडून A.I.S.H.E. पोर्टलव्दारे माहिती **०१ जानेवारी, २०२०** पासून मागविण्यात येत आहे.

**सन २०१९–२० मध्ये/पूर्वी ज्या महाविद्यालयांना/परिसंस्थांना राज्य सरकारकडून मान्यता व विद्यापीठातील शैक्षणिक विभागाकडून संलग्निकरण मिळालेले आहे. अशा सर्व महाविद्यालयांनी/परिसंस्थांनी अखिल भारतीय उच्चतर शिक्षा सर्वेक्षण कार्यक्रम (A.I.S.H.E.) वर नोंदणी करून माहिती भरणे बंधनकारक आहे. जर संबंधित महाविद्यालयांनी/परिसंस्थांनी सदर वेबपोर्टलवर नोंदणी केली नाही तर भविष्यात होणा–या नुकसानीस संबंधित महाविद्यालय/परिसंस्थेचे मा. प्राचार्य/मा. संचालक व नोडल अधिकारी जबाबदार असतील याची कृपया सर्वांनी गांभिर्यपूर्वक नोंद घ्यावी. सन २०१९–२० पूर्वी ज्या महाविद्यालये व परिसंस्थांनी अखिल भारतीय उच्चतर शिक्षा सर्वेक्षण कार्यक्रम (A.I.S.H.E.) च्या वेबपोर्टलवर अद्यापही नोंदणी केलेली नाही, अशा महाविद्यालये व परिसंस्थांनी सदर वेबपोर्टलवर अद्यापपर्यंत नोंदणी का केली नाही याचा खुलासा मा. शिक्षण संचालक, (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे यांच्याकडे त्वरित सादर करावा**

आणि त्याची प्रत विद्यापीठातील अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्षाकडे सादर करून तातडीने सदर वेबपोर्टलवर नोंदणी करावी.

तसेच सन २०१९–२० मध्ये ज्या महाविद्यालयांना/परिसंस्थांना नव्याने मान्यता मिळालेली आहे, अशा महाविद्यालयांनी/परिसंस्थांनी अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण कार्यक्रमांतर्गत संबंधित वेबपोर्टलवर, महाविद्यालयाचे/परिसंस्थांचे नांव समाविष्ट करण्यासाठी नोडल अधिका–याचे नांव, मोबाईल नंबर, महाविद्यालयाचे/परिसंस्थांचे नोंदणी केलेले ई–मेल आयडी, शासन निर्णय व संलग्निकरणाचे पत्र **(Affiliation Letter)** इ. माहिती पोर्टलवर अपलोड करून नोंदणी करावी. तसेच पुढील मान्यतेकरिता **(Registration Approval)** संबंधित महाविद्यालये/परिसंस्थांच्या नोडल अधिका–यांनी मा. शिक्षण संचालक, (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे १ यांच्या कार्यालयाकडे वरील कागदपत्रांसह व्यक्तिशः उपस्थित राहून मान्यता घेणे गरजेचे आहे.

**संबंधित महाविद्यालयांनी व परिसंस्थांनी अखिल भारतीय उच्चतर शिक्षा सर्वेक्षण कार्यक्रम (A.I.S.H.E.) मध्ये शैक्षणिक वर्ष सन २०१९–२० मधील DCF–II ची माहिती पूर्णपणे भरल्यानंतर सदर महाविद्यालये व परिसंस्थांनी ऑनलाईन पध्दतीने अर्ज करून विहीत मुदतीत ना–हरकत प्रमाणपत्र प्राप्त करून घेणे आवश्यक आहे, याची महाविद्यालयांच्या/परिसंस्थांच्या मा. प्राचार्य/मा. संचालक व मा. नोडल अधिका–यांनी नोंद घ्यावी.** त्याची प्रक्रिया खालीलप्रमाणे –

www.unipune.ac.in → BOD Online → Login → For College Users → College Login ID → Password → NoC Details → Fill A.I.S.H.E. Info.→ Select Nodal Officer/Principal's Name → Write AISHE Code → Submit → Print NoC Format on College Letterhead 1. Upload NoC Format with Principal/Director's Sign. 2. Upload A.I.S.H.E. Certificate → Submit.

सदरील माहिती शासनास अत्यावश्यक असून महाविद्यालयांनी व परिसंस्थांनी **दि. ३१ जानेवारी, २०२०** पर्यंत पूर्ण माहिती भरणे बंधनकारक असून लवकरात लवकर पूर्ण करून सहकार्य करावे. यासंदर्भात काही अडचणी आल्यास महाविद्यालयांनी/परिसंस्थांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्ष, दूरध्वनी क्र. ०२०–२५६०१२२३ यांच्याशी संपर्क साधावा.

आपला,

३१/१२/१९

(मुं. वि. रासवे)
उपकुलसचिव,
अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्ष
(अतिरिक्त कार्यभार)

प्रत माहितीसाठी –

१. मा. कुलसचिव, प्रस्तुत विद्यापीठ.
२. सहायक कुलसचिव, मा. प्र–कुलगुरू कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.